**मुख्य वनसंरक्षक (प्रा) यवतमाळ, वनवृत्त यवतमाळ यांचे कार्यालय**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पळसवाडी कॅम्प, दारव्हारोड, यवतमाळ-४४५००१**
फोन नं.०७२३२-२४२८९४/२४२१९४ फॅक्स-०७२३२-२४२१९४ ई-मेल-conytlyvt@gmail.com/ ccftyavatmal@mahaforest.gov.in

**तातडीचे/ ई-मेलव्दारे.**

विषयः- फाळेगाव संग्राहक योजना ता. जि. वाशिम
वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत ७.६५ हे.
वनजमीन मागणी प्रस्ताव.

जा.क्र.मुवसं(य)/कक्ष-१०/वसं/ ७४२ /२०१५-१६
यवतमाळ-४४५ ००१, दिनांक १४/ ०५ /२०१५.

संदर्भः- या कार्यालयाचे पत्र क्र. मुवसंय/कक्ष-१०/ वसं/ ६४३० दि.२७.०३.२०१५.

---ooo---

उपवनसंरक्षक, अकोला यांनी विषयांकीत प्रस्तावाबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता केली अथवा नाही या बाबत या कार्यालयास अवगत न करताच प्रस्ताव Online व्दारे या कार्यालयास सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात दिलेल्या त्रुटींची पुर्ततेबाबत सविस्तर माहिती आजच ई-मेलव्दारे सादर करावी.

सदर प्रस्तावाची बारकाईने तपासणी करुन त्रुटीरहीत प्रस्ताव Online तसेच Hard Copy व्दारे सादर करण्यास आपणास वारंवार लेखी व दुरध्वनी व्दारे कळविण्यात आलेले असताना सुध्दा प्रस्तावात जुन्या दराप्रमाणेच पर्यायी वनीकरण योजना जोडलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, त्यामुळे पर्यायी वनीकरणाची योजना सन २०१५-१६ चे दरानुसार तयार करुन आजच Online करावी व साक्षांकित प्रत आजच ई-मेलव्दारे या कार्यालयास सादर करावी.

सिंचन प्रकल्प प्रस्ताव तातडीने निकाली काढण्यासाठी शासन स्तरावरुन तसेच सदर प्रकल्पाचे मंजुरीबाबत सहाय्यक अधिक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम तसेच कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम यांचेकडुन सतत पाठपुरावा सुरु आहे, याबाबत आपणास वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे, त्यामुळे प्रकरणी वरीलप्रमाणे online मध्ये पुर्तता करुन तसेच साक्षांकित प्रत आजच ई-मेलव्दारे या कार्यालयास सादर करावी. कृपया यास प्रथम प्राधान्य द्यावे. सबब प्रस्ताव आपले कार्यालयास online व्दारे परत पाठविण्यात येत आहे.

**मुख्य वनसंरक्षक (प्रा)**
**यवतमाळ**

14.5.15

प्रति,
श्री. पी.जे. लोणकर (भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
अकोला.

Gen Lr New66